# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

परिपत्रक क्र. २३
१९९८-९९

क्र. एस.आर.ए/एफ सी/परि-३/२२४१/९८
दिनांक : २०.१०.९८

## परिपत्रक

**विषय : झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे विकासकाकडून जमा होणाऱ्या रु. २०,००० प्रती सदनिका या रकमेच्या वापराच्या नियोजनाबाबत.**

सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) च्या परिशिष्ट IV मधील कलम ९.१ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन सदनिका, बालवाडी व समाजमंदीर यामागे प्रत्येकी रु.२०,००० याप्रमाणे, योजनेच्या विकासकाने, या योजनेतील इमारतीचा राहण्याचा दाखला घेण्यापूर्वी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे संपूर्ण रक्कम जमा करावयाची आहे. संबंधित योजनेतील मूळ झोपडपट्टीवासीयांची सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झाल्यावर त्या संस्थेमार्फत, उपरोक्त प्राप्त झालेल्या रकमेवरील व्याजातून सर्व पुनर्वसन सदनिकांच्या देखभालीच्या खर्चाचा/कराचा बोजा भागविण्याचे अभिप्रेत आहे. या रकमेवर कमीतकमी १० वर्षे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियंत्रण राहून त्यावर प्राप्त होणाऱ्या व्याजाचा विनियोग झोपडपट्टी पुनर्वसित झालेल्या झोपडपट्टीवासीयांच्या पंजिकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेस करता यावा या हेतूने खालील प्रमाणे सूचना प्रसारित करण्यात येत आहेत.

१. झोपडपट्टीवासियांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेने, त्यांना रहिवासासाठी ओळखपत्राचे वाटप झाल्याचे व सहकारी गृहनिर्माण संस्था पंजिकृत झाल्याचे प्रथम झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कळवावे. तसेच विहित नमुन्यात (नमुना `A` सोबत जोडला आहे.) ठेवीच्या रकमेची मागणी करावी.

२. उपरोक्त सूचना प्राप्त झाल्यावर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेस(पदधिकाऱ्यांना) पंजीकरण प्रमाणपत्र व सदस्यांच्या अधिकृत यादीसह कार्यालयात पाचारण करावे.

३. विकासकाकडून जमा करण्यात आलेल्या देखभाल ठेवीच्या रकमेची अधिकृत यादीतील सदस्य संख्येच्या प्रमाणात, त्या संबंधित सहकारी संस्थेचे ज्या राज्य सहकारी बँकेच्या शाखेत खाते उघडण्यात आले आहे त्या शाखेवर, १० वर्षाइतक्या काळाकरीता टर्म डिपॉझीटची पावती

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्या संयुक्त नावे घेण्यात यावी. ही पावती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडेच वित्त विभागात ठेवण्यात यावी.

४. ही पावती घेताना बँकेस वित्त विभागाने खालील सूचना द्याव्यात

अ) जमा रकमेवर अर्जित झालेले तिमाहीचे व्याज नियमितपणे बँकेकडून संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या खात्यावर जमा करण्यात यावे.

ब) इतर रक्कम ज्या प्रमाणे काढली जाते त्याप्रमाणेच या व्याजाची उचल करण्याचे अधिकार संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेस राहतील.

क) संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेने मागणी केल्यावर बँकेने सहकारी संस्थेस नियमितपणे हिशोब द्यावेत.

ड) दहा वर्षाच्या कालावधीनंतर सदर पावतीची रक्कम सहकारी संस्थेच्या नावे जमा करावी. त्याकरीता सहकारी संस्थेने प्राधिकरणाकडे अर्ज करावा म्हणजे पावती सहकारी संस्थेस हस्तांतरित करण्यात येईल.

५. सहकारी संस्थेने त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या विज बिले, पाण्याची बिले, प्रॉपर्टी टॅक्स, लिजरेंट इ. भागविण्यासाठी या व्याजाच्या रकमेचा वापर करावा. १० वर्षांनतर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व सहाकारी गृहनिर्माण संस्था यांच्या संयुक्त नावावर असलेली पावती वटविल्यावर प्राप्त होणाऱ्या रकमेचा व वापराचा सर्व हक्क त्या संस्थेचा राहील.

६. या सूचना व विहित पद्धती तात्काळ अंमलात येईल.

सही

मुख्य कार्यकारी अधिकारी